CS (Main) Exam,2019



# मराठी (प्रश्न-पत्र–I)

( साहित्य )

वेळ : तीन तास

कमाल अंक : 250

## प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

**उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया पुढील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात**

**आठ** प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, तिचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न अनुक्रमानेच गृहीत धरले जातील. एखाद्या प्रश्नाचा अंश जरी सोडविलेला असेल, तरी जर तो खोडलेला नसेल तर गृहीत धरला जाईल. कोणतेही पृष्ठ अथवा पृष्ठाचा काही भाग प्रश्नोत्तरपुस्तिकेत कोरा सोडला असेल, तर त्यावर काट मारावी.

# MARATHI (PAPER—I)

( LITERATURE )

Time Allowed : Three Hours

Maximum Marks : 250

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (*150*) शब्दांत लिहा : 10×5=50

(a) ''भाषेमुळे समाज घडतो आणि समाजाचा भाषेवर परिणाम होतो'', या विधानाची चर्चा करा.

(b) भाषाभ्यासाच्या प्रमुख अंगांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

(c) अहिराणी बोलीची प्रमुख वैशिष्ट्ये सांगा.

(d) क्रियापदांचे कोणकोणते प्रकार पडतात, ते सोदाहरण सांगा.

(e) लोकसाहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) चॉम्स्की या भाषावैज्ञानिकाच्या भाषाविषयक संकल्पनांविषयी सविस्तर विवेचन करा. 20

(b) तेराव्या शतकातील मराठी भाषेचे वेगळेपण सोदाहरण स्पष्ट करा. 15

(c) 'लोकगीत' ही संकल्पना स्पष्ट करून त्याच्या गुणवैशिष्ट्यांसंबंधी चर्चा करा. 15

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) कोणत्याही भाषकाला स्वभाषेचाही अभ्यास का करावा लागतो, ते विशद करा. 20

(b) प्रमाणभाषा आणि बोली यांमधील फरक स्पष्ट करा. 15

(c) भाषा ही निसर्गदत्त आहे की प्रयत्नसाध्य, ते विशद करा. 15

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(a) सतराव्या शतकातील मराठी भाषेची स्वरूपवैशिष्ट्ये विशद करा. 20

(b) प्रयोग म्हणजे काय, ते सांगून त्याचे प्रकार कोणते, ते सोदाहरण सांगा. 15

(c) द्वितीया आणि षष्ठी या विभक्तीविषयी असलेल्या वादांसंबंधी सर्वांगीण चर्चा करा. 15

## SECTION—B

**5.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशेपन्नास (*150*) शब्दांत लिहा : 10×5=50

(*a*) महानुभाव संप्रदायाच्या साती ग्रंथांचे स्वरूप विशद करा.

(*b*) संतवाङ्मयाचे स्वरूप सांगून त्याच्या सामाजिक फलश्रुतीविषयी विवेचन करा.

(*c*) पंडिती काव्याचे सामर्थ्य आणि मर्यादा यांविषयी विवेचन करा.

(*d*) मराठीतील स्त्रीवादी साहित्याचे गुणविशेष विशद करा.

(*e*) साहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) मराठीतील सामाजिक जाणिवेच्या कवितेचा सोदाहरण परामर्श घ्या. 20

(*b*) समाज आणि त्याची संस्कृती या दोहोंचा साहित्याशी असलेला संबंध स्पष्ट करा. 15

(*c*) मराठीतील नवकथेच्या क्षेत्रातील गंगाधर गडगीळांच्या योगदानाविषयी चर्चा करा. 15

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) मराठीतील कादंबरीच्या क्षेत्रात हरी नारायण आपटे यांनी घडवून आणलेल्या बदलांविषयी सविस्तर चर्चा करा. 20

(*b*) मराठी कथेतील उत्क्रांतिमार्गातील विविध टप्पे सांगून त्यांविषयी विवेचन करा. 15

(*c*) साहित्याच्या मूल्यमापनाचे महत्त्व विशद करा. 15

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) शाहिरी कवितेच्या गुणदोषांविषयी विवेचन करा. 20

(*b*) दलित साहित्याचे वेगळेपण कशात आहे, ते विशद करा. 15

(*c*) साहित्यसमीक्षेच्या निरनिराळ्या पद्धती कोणत्या, ते सांगून त्यांसंबंधी सोदाहरण चर्चा करा. 15

★★★